# सिडको उदयान कामगारांचा कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

पनवेल ( ) सिडको उदयानात काम करणारे महाराष्ट्र कामगार संघटनेचे कामगार आणि महिलांनी आ.प्रशांत ठाकुर तसेच पनवेल तालुका कॉंग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत कामगार नेते व कॉंग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते बी.के.राजे आणि सागर राजे यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

यावेळी आ.प्रशांत ठाकुर म्हणाले की, युवक, महिला व कामगारांचा कॉंग्रेस पक्षात सतत ओघ सुरू आहे. कॉंग्रेसने केलेल्या तालुक्यातील व शहरातील विकास कामांमुळेच सर्व जनता लोकनेते रामशेठ ठाकुर यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवुन कॉंग्रेसमध्ये प्रवेश करीत आहेत त्यांचा विश्वास सार्थ ठरून त्यांना सन्मानाची वागणुक दिली जाईल असे सांगुन आ.प्रशांत ठाकुर पुढे म्हणाले की, गोरगरिब जनतेला रोजगार व त्यांची उपजीवीका भागविण्यासाठी येथील कॉंग्रेस पक्ष सदैव त्यांच्या पाठिशी राहिल अशी ग्वाहीही त्यांनी प्रवेशकर्त्या कार्यकर्त्यांना दिली.

कळंबोली, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, सागवाडी, विहीघर, आदई, वाघेरा, तुर्भा, वाघीचा वाडा, नेरे, हरीग्राम, टेभोंडे, धोधानी या गावांतील तुकाराम पंडीत गणेश पाटील , बुधाजी घुटे वसंता जाधव, संजय एकाडे, काना मधे, छगन भोईर, जोमा चौधरी , नारायण मोरे, कमळया मधे, रामा चौधरी, गोमा पारधी, जोम निरगुडा, पऱ्या पारधी, गुरूनाथ चौधरी, वाळक्या भगत, बाम्या निरगुडा, वाळक्या निरगुडा, बाळाराम निरगुडा, गंगाराम भगत, अशोक पारधी, चंद्रकांत फडके, लक्ष्मण फडके , काशिनाथ व्यवहारे, देहू मधे, रमेश घुटे, नरेश सोनावणे, महादेव मधे, कान्हु मधे, चंद्रकांत निरगुडा, मंगळया निरगुडा, इसराईल सय्यद, गोमा पारधी, रोशन घुटे, राजु जाधव, भुरा निरगुडा, धाया भगत, रामा मधे, पद्माकर पाटील, पासु सय्यद, पप्या पारधी, सुशिला जाधव, यमुनाबाई मोकल आदई, कमळबाई राठोड, वत्सला पाटील, राधीबाई घुटे, संगीता मोरे, शिला पंडीत, ज्योती घुटे, सुनीता एकाडे, जिजाबाई व्यवहारे, रेखा राजु जाधव, मंदा वाकडे , शकुंतला जाधव, मिना निरगुडा, पिंकी मधे या सिडको उदयानात काम करणाऱ्या महाराष्ट्र कामगार संघटनेच्या कामगार आणि महिलांनी आ.प्रशांत ठाकुर तसेच पनवेल तालुका कॉंग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत कामगार नेते व कॉंग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते बी.के.राजे आणि सागर राजे यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.